महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/निविदा/३०६७२ दिनांक : १६/१२/२०२१

# परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर कामगारांच्या सेवा घेण्यासंदर्भातील निविदा / कंत्राट याबाबतचे सुधारित निर्देश तसेच कामगारांना वेळेत व त्यांच्या बँक खात्यामध्ये किमान वेतन व अनुषंगीक भत्ते मिळण्यासाठी सुधारित कार्यपध्दती.

संदर्भ : १. प्रशासकीय परिपत्रक क्र. औसंवि/अ/५३६, दि. ०२/०५/२०१६.
२. सुधारित परिपत्रक क्र. औसंवि/अ/६८२, दि. १०/०१/२०१७.
३. सुधारित परिपत्रक क्र. औसंवि/अ/कि.वे./२२९६९, दि. १९/०९/२०१७.
४. सुधारित परिपत्रक क्र. औसंवि/अ/कि.वे./३००२७, दि. ०८/१२/२०१७.
५. महावितरण कंपनीचा मंडळ ठराव क्र. २३९४, दि. २४/११/२०२१.

***************

उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या प्रशासकीय परिपत्रकान्वये कंत्राटी कामगारांची सेवा उपलब्ध करुन घेण्यासंदर्भात कंत्राटदार नियुक्तीची निविदा (Tender) काढण्याचे व त्यासंदर्भात कामाचा आदेश (Work Order) देण्याचे अधिकार मंडलस्तरीय समितीला देण्यात आले असून, मंडलस्तरीय समितीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता तसेच परिमंडळ कार्यालय यांच्याकडून पुढील काळासाठी किती कंत्राटी मनुष्यबळाची गरज आहे, याचा अहवाल मागवून प्रचलित अधिनियम / नियमावलीतील तरतुदीचा विचार करुन मंडलस्तरावर एकत्रितरीत्या आवश्यकतेप्रमाणे जास्तीत-जास्त ०१ वर्षासाठी निविदा काढण्याचे निर्देश देण्यात आले होते.

२. वर नमूद केल्यानुसार, मंडलस्तरावर सर्व विभागांची एकत्रित निविदा प्रसिद्ध करतांना त्याबाबतची प्रशासकीय मंजूरी व इतर कार्यवाहीसाठी होणारा विलंब पाहता, वीज ग्राहकांना ग्राहकाभिमुख सेवा देण्यासाठी अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. उपरोक्त बाबींचा विचार करता, संचालक मंडळाने (Board of Director) महावितरण कंपनीचा मंडळ ठराव क्र. २३९४, दि. २४/११/२०२१ अन्वये, महावितरण कंपनीतील संभाव्य रिक्त पदे विचारात घेता, कंत्राटदाराद्वारे कंत्राटी कामगारांची सेवा उपलब्ध करुन घेताना, मंडलस्तरावर सर्व विभागांची एकत्रित निविदा प्रसिद्ध करण्याऐवजी मंडलस्तरावर विभागनिहाय निविदा प्रसिद्ध करण्याबाबत मंजूरी दिली आहे.

४. SBD परिपत्रक क्र. २९३८१, दि. २३/१०/२०१९, प्रशासकीय परिपत्रक क्र. औसंवि/अ/५३६, दि. ०२/०५/२०१६ तसेच या संदर्भातील सर्व सुधारित परिपत्रकातील इतर तरतूदी अबाधीत राहतील.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal या संकेतस्थळावर Industrial Relations Department येथे प्रसिद्ध करण्यात आले असून, सदर परिपत्रकाची मुद्रांकित प्रत कोणत्याही कार्यालयास देण्यात येणार नाही.

(अरविंद भादीकर)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रत : प्रेक्षण यादी प्रमाणे क्षेत्रिय कार्यालयातील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

D:\SSPisey 3\OUTSOURCING\Tender.docx